**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

## प्रेसनोट दिनांक – १८/०३/२०२४

**दि. १७/०३/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी १०८/२०२४ भा.द.वि. ३९९ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१६/०३/२०२४ रोजी २०.३० वा.चे सु स्मशानभुमी ओटा स्कीम निगडी पुणे येथे सार्वजनीक ठिकाणी

गुन्हा दाखल :- दि.१७/०३/२०२४ रोजी ०२.४६ वा

फिर्यादी :- विनायक सुभाष मराठे, पोशि/१७०४, नेमणुक निगडी पोलीस ठाणे, पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड पुणे ९३७०४७४३७५

आरोपी :- १) गणेश तुकाराम सांगोळकर, वय-२३ वर्षे, रा. घर क्र. आय/७/१३, संजय हॉटेलजवळ, मिलींदनगर ओटास्कीम निगडी पुणे २) चंद्रकांत अंकुश चव्हाण, वय-३६ वर्षे रा. उमेश निवास, रेणुका मंगल कार्यालया जवळ, रुपीनगर तळवडे पुणे, ३) विनोद शिवशरण हिप्परीकर वय-३५ वर्षे, रा. आय/७/६, राजरत्न बुध्दविहाराजवळ, संजय हॉटेल चौक, ओटास्कीम निगडी पुणे ४) प्रकाश चंद्रकांत धोत्रे रा. दत्त मंदिराजवळ, रुपीनगर तळवडे ५) पंचु तावडे (पुर्ण नाव माहित नाही) रा. उमेश निवास, रेणुका मंगल कार्यालयाजवळ, रुपीनगर तळवडे
**आरोपी क्र १ ते ३ अटक**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ ते ५ यांनी दरोडा घालण्याचे उद्देशाने रिक्षा क्र एमएच १४ जीसी ६४२४ जवळ उभे असताना फिर्याछी व सोबतचा स्टाफ असे त्यास पकडण्यास गेले असता त्यातील आरोपी क्र १ ते ३ यांना पकडले असता त्यांचे ताब्यात २ गावठी कट्टे मिरचीपुड व रिक्षा असा एकुण ६४,०००/- रु किंमतीचा मुद्देमालासह मिळुन आले व आरोपी क्र ४ व ५ हे अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले आहेत म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि देशमुख ८६६८५५६१००

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ३१९/२०२४ भादवि कलम १४३,१४७, १४८,१४९, ३२६,३३६, ३२३,५०४, ५०६,प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १७/०३/२०२४ रोजी दुपारी १/४० वा. चे सुमारास मोरया कॉलनी लेननंबर २, कासारसाई, ता. मावळ, जि. पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.१७/०३/२०२४ रोजी २२.१७ वा

फिर्यादी :- सदाशिव भिमाशंकर शिंदे वय २६ वर्षे धंदा-चालक रा. श्री गणेश कॉलनी, संत तुकाराम कारखाना समोर, कासारसाई, ता. मुळशी जि. पुणे. मो.८८८८५१४४०३

आरोपी :- अक्षय सदाशिव सुरोसें वय २२ वर्षे रा. लेननंबर ३, मोरया कॉलनी, कासारसाई पुणेव इतर ५ इसम
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना रेणुका कदम यांचा इन्स्टाग्राम वर हाय असा मॅसेज आला व त्यावरती फिर्यादी यांनी हाय असा मॅसेज पाठविला ही बाब रेणुका कदम यांचे वडील सदाशिव कुरोशे यांना समजल्याने त्यांनी त्यांचे चुलते अश्रुबा शिंदे यांना सांगितली व त्यांचे चुलते यांनी दोन्ही मुले आपली आहे. पुन्हा असे करणार नाही त्यावर सदाशिव सुरोशे यांनी मी मुलाचा पाय काढल्याशिवाय राहणार नाही अशी धमकी दिली. तसेच दि. १७/०३/२०२४ रोजी फिर्यादी हे गप्पा मारत थांबलो असता आरोपी क्र १ हा सदर ठिकाणी इतर५ मुले घेऊन येऊन त्यांना बाजूला ये मला तुझ्याशी बोलायचे आहे. त्याच वेळेस फिर्यादीचे काका अश्रुबा तेथे आले व इतर मुलांना समजावून सांगत असतांना आरोपी क्र १ याने त्याचे हातातील लोखंडाच्या कुठल्यातरी साहित्याने फिर्यादीच्या डोक्यात मारले व इतर ५ इसमांनी तेथील दगड घेऊन फिर्यादीचे डोक्यात मारून डोक्यात ३ ठिकाणी जखम केली व फिर्यादीचे काकांना दगड फेकून मारले त्यामध्ये त्यांचे हनुवटीच्या खाली जखम केली तसेच काकांच्या छातीत दगड मारला आहे. तसेच फिर्यादीला व काकांना लाथा बुक्यांनी मारहाण केली आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि सरडे ९९२३४०६४७६

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण १८६/२०२४ भा.दं.वि कलम २७९,३३८, ३०४(अ), ४२७ मो वा का क १८४,१३४/१७७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१६/०३/२०२४ रोजी २२/०० वा चे सु साबळेवाडी जिल्हा परिषद शाळेजवळ चाकण शिक्रापुर रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि.१७/०३/२०२४ रोजी ०२.५९ वा |
| फिर्यादी | :- | सागर महादेव सायकर वय २५ वर्षे, रा.राशीनकरमनवाडी, ता.कर्जत जि.अहमदनगर ९८३४०३०३५२ |
| आरोपी | :- | अज्ञात वाहना वरील अज्ञात चालक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी याचा भाऊ शुभम महादेव सायकर,वय २० वर्षे हा बजाज पल्सर गाडी नं.एम एच १४ डी एफ ८३३७ हिचेवरुन चाकण कडुन शिक्रापुर कडे जात असताना त्याचा साबळेवाडी जिल्हा परिषद शाळेजवळ चाकण शिक्रापुर रोडवर बजाज पल्सर गाडी हिला अज्ञात गाडीवरील अज्ञात चालकाने भरधाव वेगात गाडी चालवुन पाठीमागुन ठोस देवुन सदर अपघातामध्ये फिर्यादीच भावाचे तोंडावरुन गाडीचे चाक घालुन गंभीर दुखापत होवुन त्याचे मृत्युस व गाडीचे नुकसानीस कारणीभुत होवुन सदर अपघात ठिकाणी न थांबता पळुन निघुन गेला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोनि गावडे ९८७०५४८०४३ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी १०७/२०२४ भा.द.वि. ३०७, ५०६, ४२७,३४, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), महा पोलीस अधि कलम ३७ (१)(३) १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१६/०३/२०२४ रोजी पहाटे ०५/१५ वा.चे दरम्यान अशोका निवासजवळ, आई माताजी मंदिराच्या विरुध्द बाजुस, म्हासाकांत चौकते लोकमान्य हॉस्पिटल चौक दरम्यान प्राधिकरण निगडी पुणे येथे सार्वजनिक रस्त्यावर |
| गुन्हा दाखल | :- | दि.१७/०३/२०२४ रोजी ०२.४६ वा |
| फिर्यादी | :- | सुजित शामराव जाधव, वय-५४ वर्षे, व्यवसाय- सेवानिवृत, रा. घर क्र.६०, आयरेकर बिल्डींग च्या पाठीमागे, दत्तवाडी, आकुर्डी पुणे |
| आरोपी | :- | बारक्याभाई, दुध्या, आदल्या, नन्या (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही ) व ४ अनोळखी मुले (पुर्णनाव व पत्ता माहित नाही )<br>**निष्पन्न आरोपी**<br>१) अविनाश राजु शिंदे वय २० वर्षे रा घर क्र के/२ संजय हॉटेल चौक जवळ से नं २२ ओटास्कीम निगडी पुणे<br>**आरोपी क्र १ अटक** |
| तपशिल | :- | वर नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पायी मॉर्निंग वॉक करत असताना यातील आरोपी यांचेपैकी एका काळया रंगाचा शर्ट घातलेल्या मुलाने फिर्यादीचे गाडीवर रस्त्यावर पडलेला दगड उचलुन गाडीच्या पाठीमागील काचावर मारुन काच फोडुन नुकसान केली म्हणुन फिर्यादी यांनी त्यांचे गाडी वर दगड मारुन काच का फोडली अशी विचारणा केली. तेव्हा त्यातील एक बारक्या भाई काळया रंगाचा व त्याने अंगात पांढरट रंगाचा शर्ट व त्यावर जी-याच्या आकाराचे चिन्ह असलेला शर्ट असलेला मुलगा हातात कोयता घेऊन, फिर्यादीकडे धावुन आला, फिर्यादीचा गळा आवळुन, फिर्यादीला म्हणाला की, मला बारक्या भाई म्हणतात. असे म्हणुन दुध्या,आदल्या, नन्या यांना म्हणाला की, धरा रे याला, तुला आता खल्लास करतो असे म्हणुन जाणीव पुर्वक फिर्यादीस जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याने त्याचे हातातील कोयता फिर्यादी चे डोक्यावर मारला. तेव्हा फिर्यादी यांनी सदरचा वार चुकवुन, आरडा ओरडा करत, फिर्यादी त्यांचे घराचे दिशेने पळु लागलो. तेव्हा त्या मुला पैकी तीन ते चार मुले हातात काठया व कोयते घेऊन फिर्यादीचा पाठलाग केला. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि यलमार ९४२३२३९९४३ |

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी २२३/२०२४ भादंवि.कलम- ३०६, ४९८ अ, ३२३, ५०४, ३४ व हुंडा प्रतिबंध अधिनियम चे कलम ४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २९/०१/२०२३ रोजी पासुन ते दि०७/०२/२०२४ रोजी चे १८/३० वा पर्यंत. इंद्रप्रस्त नगरी ए- २०३ विशाल लॉन्स रोड, अंबी एम.आय.डी.सी. रोड. तळेगांव मावळ ता. मावळ जि. पुणे., महिंद्रा अँथीया सोसायटी, पिंपरी, पुणे. मधील डी- १ फ्लॅट नं. १०६ व फ्लॅट नं. ५०३, जे बिल्डींग, एम्पाअर स्केअर सोसायटी, चिंचवड पुणे. येथे

गुन्हा दाखल :- दि.१७/०३/२०२४ रोजी १८.२४ वा

फिर्यादी :- महीला फिर्यादी वय २९ वर्षे

आरोपी :- १)विक्रांत विजय शेवाळे वय- २९ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
२) विजय गणपत शेवाळे वय- ५८ वर्षे,
३) नुतन विजय शेवाळे वय- अंदाजे ४८ वर्षे
सर्व रा. इंद्रप्रस्त नगरी ए- २०३ विशाल लॉन्स रोड, अंबी एम.आय.डी.सी. रोड. तळेगांव मावळ ता. मावळ जि. पुणे

तपशिल :- नमुद ता वेळी वठिकाणी यातील आरोपी क्र १ ते ३ यांनी फिर्यादी यांचा वारंवार शाररिक व मानसिक छळ, हाताने मारहाण करुन शिवीगाळ करुन आरोपी क्र १ यास फ्लॅट घेण्यासाठी फिर्यादी यांचे वडीला कडे ५० लाख रुपये हुंडयाची मागणी केली व जो पर्यंत हुंडयाचे पैसे देत नाही तो पर्यंत मुलीला घेवुन जाणार नाही असे म्हणाल्याने यातील फिर्यादी यांचे वडीलांनी नेहमी टेन्शनमध्ये दि ०७/०२/२०२४ रोजी गळफास घेवुन आत्महत्या केले आहे. यातील आरोपी यांनी फिर्यादी हिचा शाररिक, मानसिक छळ करुन फिर्यादीच्या वडील बाळासाहेब रामभाऊ केदार वय ५७ वर्षे यांचेकडे हुंडा मागुन त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि शेटे ७२४९३४७३४७

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव एमआयडीसी ५८/२०२४ भा.दं.वि कलम ३०४(अ), २७९,३३८, ४२७,मोटारवाहन कायदा कलम १८४, १८५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१६/१२/२०२३ रोजी रात्री १२/०० वा.चे सुमारास इंदोरी गावचे हद्दीत तोलाणी कंपनी जवळ चाकणते तळेगाव दाभआडे जाणारेडांबरी रोडने

गुन्हा दाखल :- दि.१७/०३/२०२४ रोजी १६.३५ वा

फिर्यादी :- प्रशांत राजेंद्र रेळेकर पोउपनिनेमणुक तळेगाव एमआयडीसी पो.स्टेशन पिंपरीचिंचवड आयुक्तालय मो.नं- ९८२३२५४६७६

आरोपी :- दत्तात्रय गणेश चुकाटे वय-४६ वर्षे रा-रामोशीवाडा डाळ आळी तळेगाव दाभाडे ता-मावळ जि-पुणे
**(मयत)**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील मयत इसम नामे दत्तात्रय ज्ञानेश्वर चुकाटे रा-सदर याने त्याच्या ताब्यातील हिरो होन्डा स्लेन्डर प्लस मोटार सायकल नं एम एच १४ डी ई ३७१७ ही दारुचे नशेत हयगयीने भरधाव वेगात चालवुन त्याचा गाडीवरील ताबा सुटल्याने ते मोटारसायकल सह डांबरी रोडचे दक्षिणकाठावर पडुन त्याचा अपघात होवुन अपघाता मध्ये ते गंभीर जखमी होवुन त्यांची मोटार सायकलचे नुकसान करण्यात कारणीभुत होवुन स्वताचे मरणास स्वतकारणीभुत झाले आहेत म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि रेळेकर ९८२३२५४६७६

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे १४२/२०२४ भादवि कलम २७९, ३३७, ३३८ ३०४ (अ), मो. वा. का. कलम १८४, १३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १७/०३/२०२४ सकाळी ०५.१५ वा.च्या सुमारास तळेगाव ते चाकण या रोडवर बालाजी मार्बल नावाच्या दुकानासमोर तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.१७/०३/२०२४ रोजी १७.०९ वा

फिर्यादी :- विशाल भाउसाहेब वाळुंज वय ३३ वर्ष धंदा पोलीस शिपाई, बक्कल नंबर ३०८३, नेमणुक तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन ता.मावळ जि.पुणे, ९९२१३५४५७३.

आरोपी :- अज्ञात वाहन चालक

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील अज्ञात वाहनावरील अज्ञात वाहनचालक याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात जावुन, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, निश्काळजीपणे व हयगयीने वाहन चालवुन रस्त्याने जाणा-या अज्ञात इसमास जोरात धडक देवुन त्याचे कमरेच्या खालील भाग तसेच दोन्ही पाय यांस गंभीर दुखापत करून त्याचे मुत्युस कारणीभुत होउन अपघाताची माहीती न देता व जखमीस उपचाराकामी मदत न करता अपघाताच्या ठिकाणावरूण पळुण गेलेला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि कोकाटे ९१५८५७३००१

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी १०९ /२०२४ भा.द.वि.कलम३७०(३),३४ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४, ५,७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १६/०३/२०२४ रोजी २०/२० वा. सुमारास PHOENIX SPA शॉप नं- ४०३,४०४ चौथा मजला Inispiria mall निगडी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि १७/०३/२४ रोजी ०५/२२ वा

फिर्यादी :- सोनाली विलास माने वय ३० वर्षे मपोशि २५६९ नेमणूक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड ८१८००९००६३

आरोपी :- (१) महीला आरोपी वय २६ वर्षे २) दिनेश कुमार गुप्ता वय ३० वर्षे रा.मुंबई ८६०१९२९८६६२
**आरोपी क्र १ अटक आहे**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ व २ यांनी संगणमत करुन स्पा सेंटरचे नावाखाली पिडीत ०४ महिला यांना पैशांचे अमिष दाखवून त्यांना स्पा मसाज सेंटरचे नावाखाली प्राप्त करून वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करुन त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करवून घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिविका भागवित असताना आढळुन आले तसेच वरिल आरोपी यांनी घटनास्थळाचे मॉलचे खाली पार्कीग पासुन ५० फुट अंतरावर उत्तरेस महादेव मंदिर असे सार्वजनिक ठिकाण असतांना देखील त्यांचे वरिल स्पामध्ये वेश्याव्यवसाय चालवला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि देशमुख ८६६८५५६१००

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी १०४/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब) (ii) (ब), २२(क) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १७/०२/२०२४ रोजी ११.५० वा. सांगवी पोलीस स्टेशनचे हद्दीतील सांगवी स्मशान भुमीचे विरुध्द असलेल्या एस.टी. कॉलनीचे ग्राऊंडचे कोप-यामध्ये आडोशाला

गुन्हा दाखल :- दि. १८/०३/२०२४ रोजी ०२.२७ वा

फिर्यादी :- विजय दिपक दौंडकर, वय ३८ वर्षे, पोलीस नाईक ब. नं. १९१६, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय,

| | | |
|---|---|---|
| आरोपी | :- | १. ओंकार ऊर्फ सोन्या महादेव लिंगे, वय २६ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र ११ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे २. अनिकेत अनिल गोडांबे, वय २५ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र १२ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे ३. रोहन उत्तम कांबळे, वय २१ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र ०८ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे ४. रुपेश गौतम जाधव, वय २१ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र १५ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे ५. रोहन ऊर्फ पप्या महादेव लिंगे, वय २४ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र ११ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे<br>**पाहिजे आरोपी** १. विशाल ऊर्फ महाद्या गोरख कदम पत्ता माहिती नाही २. सेनानी मो.क्र. ९३९९३२४३८५ संपुर्ण नाव व पत्ता माहिती नाही ३. हर्ष रा बाणेर मो.क्र. ९७६४७६५३५३ संपुर्ण नाव व पत्ता माहिती ४. मयुर प्रविण बाराथे संपुर्ण पत्ता माहिती नाही **आरोपी क्र १ ते ५ अटक** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ ते ५ यांनी त्यांचे ताब्यामध्ये एकुण २०,८९,५००/- रु. किं. चा माल ज्यामध्ये ३,६०,०००/- किंमतीचा ७ किलो २०० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ, ४,३७,५००/- किंमतीचे १७५ ग्रम चरस, १,८०,०००/- १२ एल.एस.डी. डॉट पेपर, ०६ मोबाईल, ०१ मारुती सुझुकी स्विफ्ट, ०२ ॲक्टीवा व ०१ व्हेस्पा अश्या ०३ दुचाकी गाडया अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता कब्जात बाळगताना मिळुन आले. अ.क्र. १ ते ५ यांचे सोबत असणारा पळुन गेलेला इसम नामे मयुर प्रविण बाराथे, रा पिंपळे गुरव, पुणे संपुर्ण पत्ता माहिती नाही हा असुन अ.क्र. १ व ५ यांनी त्यांचेकडे मिळुन आलेला गांजा हा अंमली पदार्थ इसम नामे विशाल ऊर्फ महाद्या गोरख कदम संपुर्ण पत्ता माहिती नाही याने आणुन दिला असल्याचे सांगितले. तर चरस हा अंमली पदार्थ एम.पी. येथुन त्यांनी स्वतः इसम नामे सेनानी मो.क्र. ९३९९३२४३८५ संपुर्ण नाव व पत्ता माहिती नाही याचेकडुन आणला असल्याचे सांगितले. तर एल.एस.डी. पेपर हा अंमली पदार्थ इसम नामे हर्ष रा बाणेर मो.क्र. ९७६४७६५३५३ संपुर्ण नाव व पत्ता माहिती नाही याचेकडुन आणला असल्याचे सांगीतले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि तांबे ९८२३०७९८५२ |